| RNI No. MAHMAR/2020/79677 | ISSN NO. - 2582-9971 | EPAPER.BHARATSANGRAM.ONLINE www.bharatsangram.com |

गुरुवार 05 नोव्हेंबर २०२६ वाशिम | पृष्ठे ४ | अंक १४० | वर्ष ७ | किंमत ४

दैनिक
भारत संग्राम
आवाज जनसामान्यांच्या हक्काचा

वसुबारसच्या
सर्वांना हार्दिक शुभेच्छा

थोडक्यात

दारूड्याचा इसमावर काठीने हल्ला

बाभुळगाव : पोलिस ठाण्याच्या अंतर्गत कोडां येथे २४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १:३० वाजताच्या सुमारास ही घटना घडली. आरोपी विश्वनाथ अभिमान सोनावणे (वय ४० वर्षे) हा दारू पिऊन चौकात मोठ्याने लोकांना शिवीगाळ करत होता. फिर्यादी नारायण रामदास आसाम (वय ४४ वर्षे) यांनी त्याला विनाकारण शिवीगाळ का करतोस, असे विचारले. याचा राग येऊन आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करत काठीने डोक्यावर मारून जखमी केले. तसेच जीवाने मारण्याची धमकी दिली. तक्रारीवरून बाभुळगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

उसणवारीच्या पैशातुन वाद

बाभुळगाव : अंतर्गत कोंढा येथे २४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १:३० वाजता ही घटना घडली. फिर्यादी विश्वनाथ अभिमान सोनावणे (वय ४५ वर्षे) यांनी आरोपी नारायण रामदास आत्राम (वय ५० वर्षे) याला सोयाबीन सोपणीच्या कामासाठी ४०० रुपये उसने दिले होते. फिर्यादीने हे पैसे परत मागितले असता, आरोपीने 'माझ्याजवळ खर्च झाला, पैसे देत नाही' असे म्हणून शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपीने काठीने फिर्यादीच्या खांद्यावर व डोक्यावर मारून जखमी केले व जीवे मारण्याची धमकी दिली. तक्रारीवरून पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवला आहे.

जुन्या वादातून तरुणाला मारहाण

दिग्रस : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये २३ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १०:०० वाजताच्या सुमारास हा प्रकार घडला. फिर्यादी तुषार पांडुरंग राठोड (वय २७ वर्षे) हा जात असताना आरोपी भावेश रगडे (वय २६ वर्षे) आणि त्याच्या इतर ३ साथीदारांनी संगनमत करून त्याला थांबवले. 'तू आमच्यासोबत येथे बोलवून काही कारण नसताना बोलतो, तू जास्त शहाणा झाला का?' असे म्हणत आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करत लाकडी काठी व लोखंडी पाईपने पाठीवर, खांद्यावर आणि डोक्यावर मारून जखमी केले. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

इसमावर हल्ला

दिग्रस : तालुक्यातील मांडवा येथे ३ जून २०२६ रोजी मध्यरात्री २ ते ३ वाजताच्या दरम्यान ही घटना घडली. फिर्यादी विवेक प्रकाश पाटील (वय २८ वर्षे, रा. जळगाव) याच्या गाडीने आरोपीच्या गाडीला धक्का लागल्याने नुकसान झाले होते. यावरून आरोपी प्रदीप विजय चव्हाण (वय २७ वर्षे, रा. वाशीम) याने फिर्यादीच्या गाडीचा काच फोडून ७०,००० रुपयांचे नुकसान केले, त्याला दगड आणि काठीने मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली. झटापटीत फिर्यादीची ५ ग्रॅमची सोन्याची अंगठी गहाळ झाली. तक्रारीवरून पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवला आहे.

अवैध रेती वाहतुकीवर कारवाई

दिग्रस : स्थानिक गुन्हे शाखा यवतमाल आणि दिग्रस पोलिसांनी २४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ४:०५ वाजता गजानन महाराज मंदिरासमोर ही कारवाई केली. आरोपी सिद्धार्थ गजानन काजळे (वय २१ वर्षे) याच्या ताब्यातील एक लाल रंगाचा टाटा आयशर ट्रक (किंमत ५,२०,००० रुपये) आणि चोरून वाहतूक केली जाणारी ८,००० रुपयांची पांढरी रेती जप्त करण्यात आली. पोलिसांनी एकूण ६,७८,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून खान व खनिज अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

भाजपला आलेली चरबी जनता उतरवेल

गुजरात लॉबीला गोकुळ विकण्याचा डाव; ही शेतकऱ्यांशी बेईमानी- संजय राऊत

भारत संग्राम | प्रतिनिधी



मुंबई : देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या सरकारला मस्ती आली असून, लोकशाही न मानण्याची त्यांची भूमिका आहे. ज्या गोकुळच्या निवडणुकीत समविचारी पॅनलला बहुमत मिळाले, त्यांना डावलून पराभूत झालेल्यांच्या हातात पुन्हा गोकुळ द्यायचे आणि ते गुजरात लॉबीला विकायचे, हा सर्व डाव जर देवेंद्र फडणवीस करत असतील, तर ते महाराष्ट्र आणि शेतकऱ्यांशी बेईमानी करत आहेत, असे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत म्हणाले की, सत्ताधाऱ्यांना शेतकऱ्यांच्या भावना कळत नाहीत. शेतकऱ्यांनी ज्यांचे पॅनल निवडून दिले, त्यांच्या हाती कारभार जावा, असे शेतकऱ्यांना वाटत असताना; त्यांना डावलून लोकभावना दडपून स्वतःची सत्ता यावी म्हणून सरकार 4 संचालक नेमणार, ही चरबी आली कुठून? असा सवाल राऊत यांनी केला आहे. भाजपला आलेली ही चरबी आता जनता उतरवेल. त्यांना हा शब्द आवडणार नाही, पण त्यांची चरबी वाढली आहे. संजय राऊत म्हणाले की, लोकशाही मार्गाने जर तुमचे सरकार आले म्हणता, ते बदलू देणार नाही असे म्हणणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी गोकुळसाठी वेगळी भूमिका का घेतली? तिथेसुद्धा लोकशाही मार्गाने ज्या पॅनलचा विजय झाला, तो तुम्हाला पचत नसेल, तर तुम्ही महाराष्ट्रात राजकारण करायला लायक नाहीत. बहुमताचा अनादर करत पराभूत झालेल्यांना जर सत्तेत आणणार असाल, तर तुम्हाला लोक कोल्हापूरच्या रस्त्यावरच जाब विचारतील. हा आता जनतेचा लढा झाला पाहिजे. साडेपाच लाख शेतकऱ्यांचा कौल जर मुख्यमंत्री आणि केंद्रीय सहकारमंत्री मानत नसतील आणि संविधान आणि नियम बदलत असतील, तर ते चुकीचे आहे. तुम्ही पराभव स्वीकारला पाहिजे.

शहांची वृत्ती झुंडशाहीची

संजय राऊत म्हणाले की, गोकुळ वाचवण्यासाठी मविआ म्हणून सर्वांनी एकत्र यायला हवे, या मताचे आम्ही आहोत. निवडणूक झाल्यावर जनमताचा आदर करायची नाही, ही जी परंपरा देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केली आहे, त्याची किंमत त्यांना मोजावी लागेल. अमित शहा तर किंमत मोजणारच आहेत, मी त्यांना पत्रसुद्धा लिहिले आहे; पण शहा यांची वृत्ती झुंडशाहीची आहे.

ट्रम्प-मोदी-नेतन्याहू हे एक त्रिकूट

संजय राऊत म्हणाले की, ट्रम्प आणि मोदी यांच्यात एक साम्य आहे. ट्रम्प-मोदी-नेतन्याहू हे एक त्रिकूट आहे, ज्यांना वाटत होते की आम्ही करू तो कायदा. नेतन्याहू पराभूत झाले, ट्रम्प यांनी बहुमत गमावले आहे आणि ते आता नामधारी आहेत; आता भारतामध्येसुद्धा तसेच होणार. अमेरिका दुसऱ्या देशाच्या युद्धात का उतरला, हेच तिथल्या नागरिकांना समजले नाही. टोकाची धर्मांधता चालत नाही, हे अमेरिकेच्या जनतेने दाखवून दिले.

..तरी पवारांचा पक्ष भूलथापांना बळी पडणार नाही

संजय राऊत म्हणाले की, नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान आहेत. त्यांनी शरद पवार आजारी असल्यामुळे फोन केला आणि सुप्रिया सुळेंचे नाव घेत संभ्रम निर्माण केला. आजारपणाच्या चौकशीतसुद्धा जे राजकारण करतात, त्यांच्याविषयी काय बोलायचे? पंतप्रधान मोदींनी कितीही फासे टाकले, तरी शरद पवारांचा पक्ष त्यांच्या भूलथापांना काही बळी पडत नाही.

'प्राची' उपक्रमातून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला नवे व्यासपीठ

भारत संग्राम | प्रतिनिधी

वाशिम : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांची आवड निर्माण व्हावी आणि त्यांची शैक्षणिक गुणवत्ता विकसित व्हावी, या उद्देशाने जिल्हा परिषद वाशिमच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या संकल्पनेतून तसेच माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगला धूपे व प्राथमिक शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे यांच्या मार्गदर्शनाखाली 'PRACHI' (Preparing Rural Achievers for Competitive Exam Honours and Incentive Scheme – गुणवत्तेची नवीन पहाट) हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत आयोजित तीन शिष्यवृत्ती सराव परीक्षांच्या मालिकेतील पहिली परीक्षा ३ नोव्हेंबर २०२६ रोजी जिल्ह्यातील ७१ केंद्रांवर शिस्तबद्ध व शांततापूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडली.

या परीक्षेला जिल्हा परिषद शाळांमधील इयत्ता चौथी व सातवीच्या मराठी आणि उर्दू माध्यमातील एकूण १० हजार ५५४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने आणि आत्मविश्वासाने परीक्षेत सहभाग घेतला. मुख्य शिष्यवृत्ती परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षेच्या वातावरणाचा अनुभव मिळावा, उत्तरपत्रिका भरण्याचा सराव व्हावा तसेच परीक्षेविषयीची भीती दूर व्हावी, या उद्देशाने या सराव परीक्षेचे आयोजन करण्यात आले. प्रत्यक्ष स्पर्धात्मक परीक्षेच्या स्वरूपात सहभागी होण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांना आपल्या तयारीचे मूल्यमापन करता आले. यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत झाली आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या विकासासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने राबविलेल्या या उपक्रमाचे पालकांकडून स्वागत होत आहे. अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळून त्यांना भविष्यातील स्पर्धात्मक परीक्षांसाठी अधिक चांगली तयारी करता येणार आहे.असे उपशिक्षणाधिकारी कृष्णा बिरादार यांनी कळविले आहे.

वाशिममध्ये 'विकसित भारत युवा संवाद' कार्यक्रम उत्साहात

भारत संग्राम | प्रतिनिधी



वाशिम : युवकांमध्ये लोकशाहीविषयी जागरूकता निर्माण करणे आणि मतदानाच्या अधिकाराचे महत्त्व पटवून देण्याच्या उद्देशाने युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालय, भारत सरकारच्या मेरा युवा भारत केंद्र, वाशिम यांच्या वतीने राणी लक्ष्मीबाई कन्या शाळेत 'विकसित भारत युवा संवाद – आपले मत जाणून घ्या' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी युवक-युवतींनी लोकशाही मूल्ये, मतदानाचा अधिकार, संविधानिक मूल्ये आणि नागरिकांची कर्तव्ये यावर विचारमंथन केले. लोकशाहीची ताकद जागरूकता, विचारशीलता आणि जबाबदारीतून अधिक बळकट होते, असे मार्गदर्शन यूथ आयकॉन डॉ. विजय दराडे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी लोकशाही शपथ घेऊन जबाबदार नागरिक बनण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे उपमुख्याध्यापक राजेश ढाकरके होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा युवा अधिकारी सूरज शिंदे उपस्थित होते. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी युवकांचे विचार, सहभाग आणि कृती महत्त्वाची असल्याचे सूरज शिंदे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद राठोड यांनी केले, तर संजय पुराणकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मेरा युवा भारत केंद्राच्या स्वयंसेवकांनी सहकार्य केले.

व्हीबी- जी राम जी योजनेत प्रत्येक ग्रामपंचायतीत कामांना चालना द्यावी - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

भारत संग्राम | प्रतिनिधी



वाशिम : जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी व्हीबी- जी राम जी योजनेत प्रत्येक ग्रामपंचायतीत कामांना चालना द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी आज येथे दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील काटेपूर्ण दालनात श्री. कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेत जिल्ह्यातील दुष्काळ देखरेख समितीची बैठक आज झाली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील,निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारी सभागृहात तर उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी व्हीसीद्वारे उपस्थित होते. ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीसाठी व्हीबी- जी रामजी योजनेतून जास्तीत जास्त कामे सुरू होणे आवश्यक आहेत. त्यादृष्टीने आवश्यक प्रक्रिया तत्काळ पूर्ण करून घ्यावी. दुष्काळाचे गांभीर्य लक्षात घेऊन वेगाने कार्यवाही करावी. कामे शेल्फवर नाहीत म्हणून चालना मिळाली नाही असे कुठेही घडता कामा नये. तसे घडल्यास कठोर कारवाई करू, असा इशारा जिल्हाधिका-यांनी संबंधित यंत्रणांना दिला. कृषी, वन विभाग, मृद व जलसंधारण, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा आदी विभागांचा आढावाही यावेळी घेण्यात आला. अवैध उपसा रोखण्यासाठी दक्षता पथके स्थापन करण्यात आली आहेत. ग्रामस्तरीय पाणीपुरवठा व स्वच्छता समित्या, आपदा मित्र, जलसुरक्षक आणि स्वयंसेवकांना जलस्रोतांवर नियमित देखरेख व गस्त घालण्यासाठी प्रोत्साहित करावे. पाणीबचतीविषयी व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे. घरगुती पाणी बचतीबाबतही जागृती व्हावी. विशेषत: शिक्षण विभागाने शासकीय व खासगी शाळांच्या माध्यमातून जलदूत नेमावेत. विद्यार्थ्यांना स्वत:च्या घरातील पाणी उपलब्धता, वापर असे वॉटर ऑडिट करण्याचे प्रोत्साहन द्यावे जेणेकडून पाणी बचतीचा संदेश सर्वदूर पोहोचेल, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले. चारा लागवडीच्या अनुषंगाने बियाणे वाटपाचे काम लवकरात लवकर पूर्ण करून घ्यावे. जलसंधारणाची कामे व चारा लागवडीला अधिकाधिक प्रोत्साहन द्यावे, असेही त्यांनी सांगितले. जलाशयांतील पाणी उपलब्धता, वीजपुरवठा, सार्वजनिक वितरण प्रणाली आदी विविध बाबींचा आढावा यावेळी घेण्यात आला.

शरद पवार डिस्चार्जनंतर पुन्हा रुग्णालयात दाखल

भारत संग्राम | प्रतिनिधी

मुंबई : तप्रधान मोदी यांनी बुधवारी रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर NCP (SP)चे प्रमुख शरद पवार यांच्याशी फोनवरून संवाद साधला. यावेळी त्यांनी पवारांना सांगितले की, सुप्रिया आता तयार आहेत. सुप्रिया आणि आपण मिळून देश सांभाळू. आपण आराम करा.

ही माहिती पवारांचे निकटवर्तीय विठ्ठल मनियार यांनी माध्यमांशी बोलताना दिली. विठ्ठल यांच्या म्हणण्यानुसार, पवारांनी उत्तर दिले, "मी आराम करत आहे. तुम्ही सर्वजण सोबत असताना मला देशाची कोणतीही चिंता नाही." मात्र, शरद पवार आणि पंतप्रधानांनी या संभाषणाची पुष्टी केलेली नाही. खोकला आणि श्वास घेताना छातीत दुखत असल्याची तक्रार झाल्यानंतर पवारांना २ नोव्हेंबर रोजी पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले होते. दरम्यान, दिवंगत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (NCP) ज्येष्ठ नेत्यांच्या शिष्टमंडळाने रविवारी रात्री केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. काही माध्यमांच्या वृत्तांमध्ये असा दावा करण्यात आला होता की, सुनेत्रा पवार आणि त्यांचे पुत्र, राज्यसभा खासदार पार्थ पवार यांच्या एकतर्फी निर्णयांबाबत नेत्यांनी चिंता व्यक्त केली होती. मात्र, सोमवारी मुंबईत झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीनंतर NCPने सार्वजनिकरित्या विलीनीकरणाची शक्यता फेटाळून लावली.

वाशिम जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी 'माझे गाव – आरोग्य संपन्न गाव अभियान' प्रभावीपणे राबवावे- मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान

भारत संग्राम | प्रतिनिधी

वाशिम : महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत 'माझे गाव – आरोग्य संपन्न गाव अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून गावातील आरोग्य, स्वच्छता, पोषण, पर्यावरण आणि नागरिकांचे जीवनमान उंचावण्यावर भर देण्यात येत आहे. वाशिम जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विविध आरोग्य व विकासविषयक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी केले आहे.

अभियानांतर्गत गावांमध्ये सुरक्षित व शुद्ध पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, पाणी गुणवत्ता तपासणी, पाण्याचे शुद्धीकरण, वृक्षारोपण, धूरमुक्त गाव, कचरा संकलन व वर्गीकरण, कचऱ्याची योग्य विल्हेवाट आणि हागणदारीमुक्त गाव यांसारख्या बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. तसेच १०० टक्के कुटुंबांना गॅस जोडणी उपलब्ध करून देणे व चुलीचा वापर कमी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. संसर्गजन्य व कीटकजन्य आजारांबाबत जनजागृती, मलेरिया व क्षयरोग नियंत्रण, रक्तदाब आणि मधुमेह तपासणी यांसारख्या आरोग्यविषयक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. गर्भवती महिलांची नियमित आरोग्य तपासणी, संस्थात्मक प्रसूती, माता व बालमृत्यू प्रतिबंध, बालकांचे संपूर्ण लसीकरण आणि तीव्र व मध्यम तीव्र कुपोषित बालकांचे (SAM-MAM) योग्य व्यवस्थापन यावर विशेष भर देण्यात येणार आहे. किशोरवयीन आरोग्य, महिलांचे आरोग्य, वैयक्तिक स्वच्छता, लिंगाधारित हिंसाचार प्रतिबंध, व्यसनमुक्ती, कुटुंब कल्याण तसेच योग्य लिंग गुणोत्तर राखण्यासाठी जनजागृती करण्यात येणार आहे. गावातील वृद्ध, दिव्यांग नागरिक व उपशामक आरोग्यसेवेची गरज असलेल्या लाभार्थ्यांची काळजी घेणे, मानसिक आरोग्य सेवा आणि आयुष कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे, तसेच जन्म-मृत्यू नोंदणी १०० टक्के व वेळेत पूर्ण करणे या बाबीही अभियानाच्या महत्त्वपूर्ण निकषांमध्ये समाविष्ट आहेत. अभियान यशस्वी करण्यासाठी ग्रामसभा, ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या नियमित बैठका आयोजित करणे, विविध विभागांमध्ये समन्वय साधणे आणि नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत, आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभाग, पाणीपुरवठा विभाग आणि इतर संबंधित विभागांनी एकत्रितपणे काम करून गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना द्यावी. अभियानातील विविध आरोग्य व विकास निर्देशांकांच्या आधारे ग्रामपंचायतींचे गुणांकन करण्यात येणार आहे. वर्षअखेरीस मूल्यांकन करून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींची राज्य व जिल्हास्तरावरील पुरस्कारांसाठी निवड करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय पुरस्कारांमध्ये प्रथम क्रमांकासाठी ५ कोटी रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ३ कोटी रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी २ कोटी रुपये, तर जिल्हास्तरीय पुरस्कारांमध्ये प्रथम क्रमांकासाठी २५ लाख रुपये, द्वितीय क्रमांकासाठी २० लाख रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी १५ लाख रुपये असे आकर्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. वाशिम जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी अभियानातील सर्व निकषांची प्रभावी अंमलबजावणी करून गावाला स्वच्छ, आरोग्य संपन्न व आदर्श गाव बनवावे. तसेच राज्य व जिल्हास्तरीय पुरस्कार प्राप्त करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करावेत, असे आवाहन वाशिम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी केले आहे.

दैनिक
भारत संग्राम

संपादकीय
EDITORIAL



गुरुवार, दि. ०५ नोव्हेंबर २०२६ | वाशिम

अग्रलेख

भारतात सौर ऊर्जेची क्रांती

एकीकडे पारंपरिक ऊर्जा स्रोतांचे (कोळसा आणि खनिज तेल) साठे वेगाने संपत चालले आहेत आणि दुसरीकडे ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान धोक्याच्या पातळीवर पोहोचले आहे, अशा वेळी 'सौर ऊर्जा' (Solar Energy) ही मानवतेसाठी निसर्गाने दिलेली एक अमूल्य आणि शाश्वत भेट ठरत आहे. भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर दिलेल्या आश्वासनांनुसार आणि 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेअंतर्गत देशात सौर ऊर्जेच्या वापरासाठी एक अभूतपूर्व क्रांती सुरू केली आहे. पंतप्रधान सूर्य घर मुफ्त बिजली योजना, महामार्गांच्या बाजूला उभे राहिलेले सोलर पार्क्स आणि शेतकऱ्यांसाठी राबवली जाणारी 'कुसुमला' (PM-KUSUM) योजना यांमुळे भारताचा ऊर्जेचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलत आहे. परंतु, या अफाट तांत्रिक व आर्थिक प्रगतीच्या प्रवासात ग्रिडची क्षमता, बॅटरी स्टोरेजचे महागडे तंत्रज्ञान, कचरा व्यवस्थापन (Solar Waste) आणि सामान्यांच्या घरांपर्यंत या तंत्रज्ञानाचा खर्च पोहोचवण्यातील अडचणी यांसारखी गंभीर आव्हाने उभी ठाकली आहेत. या पार्श्वभूमीवर भारताच्या ऊर्जा क्षेत्राला पूर्णपणे हरित आणि स्वावलंबी बनवणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी राष्ट्रीय व पर्यावरणीय गरज ठरली आहे. भारतीय संविधानाच्या कलम ५१-अ (ह) अन्वये प्रत्येक नागरिकाने वने, नद्या आणि नैसर्गिक पर्यावरण रक्षणाचे आणि संवर्धनाचा अधिकार व कर्तव्य पाळावे, असे स्पष्ट केले आहे. तसेच, संविधानाच्या कलम २१ मधील 'जीवन जगण्याच्या अधिकारात' शुद्ध हवा आणि स्वच्छ पर्यावरण मिळण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाने अंतर्भूत केला आहे. आज जगातील अनेक विकसित देश कार्बन उत्सर्जनामुळे संकटात सापडले आहेत, अशा वेळी भारताने 'पॅरिस कराराची' उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आणि २०२७ पर्यंत ५०० गिगावॅट गैर-जीवाश्म ऊर्जा क्षमतेचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य गाठण्यासाठी सौर ऊर्जेच्या विस्तारावर भर दिला आहे. राजस्थान, गुजरात आणि तामिळनाडू यांसारख्या राज्यांमध्ये जगातील सर्वात मोठे सोलर पार्क उभे राहिले आहेत, ज्यातून निर्माण होणारी वीज केवळ उद्योगांनाच नव्हे तर रेल्वे आणि मेट्रो चालवण्यासाठीही वापरली जात आहे. या सौर क्रांतीचा सर्वात मोठा आणि थेट फायदा 'भारतीय शेती आणि ग्रामीण विद्युतीकरणाला' होत आहे. भारताचा शेतकरी हा नेहमीच विजेच्या अनियमित पुरवठ्यामुळे आणि वीज बिलांच्या ओझ्यामुळे त्रस्त राहिलेला आहे. रात्रीच्या वेळी शेतात जाऊन पाणी सोडावे लागल्यामुळे विषारी सर्पदंश किंवा इतर धोक्यांचा सामना करावा लागतो. परंतु, 'पीएम-कुसुम' (PM-KUSUM) योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना सोलर पंप उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांना दिवसाढवळ्या मोफत आणि अखंड वीज मिळू लागली आहे. तसेच, शेतकरी आता केवळ 'अन्नदाता' राहत नसून ते आपल्या पडीक जमिनीवर सोलर पॅनल्स बसवून 'ऊर्जादाता' (Energy Provider) बनले आहेत, जे अतिरिक्त वीज ग्रिडला विकून हक्काचे उत्पन्न मिळवत आहेत. दुसरे सर्वात मोठे परिवर्तन 'शहरी घरांच्या आणि उद्योगांच्या छतांवर बसवलेले सौर प्रकल्प' (Rooftop Solar) या माध्यमातून होत आहे. केंद्र सरकारच्या 'प्रधानमंत्री सूर्य घर मुफ्त बिजली योजना' अंतर्गत देशभरातील कोट्यवधी कुटुंबांना त्यांच्या घराच्या छतावर सोलर पॅनल बसवण्यासाठी भरघोस अनुदान दिले जात आहे. यामुळे मध्यमवर्गीय कुटुंबांचे हजारो रुपयांचे मासिक वीज बिल शून्यावर आले आहे. व्यावसायिक आणि औद्योगिक कंपन्यांनीही आपल्या कारखान्यांवर सोलर सिस्टीम बसवून विजेचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणावर कमी केला आहे, ज्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला हरित गती मिळाली आहे. तथापि, या अफाट प्रगतीच्या प्रवासात काही गंभीर तांत्रिक आणि प्रशासकीय आव्हाने देखील निर्माण झाली आहेत. यात सर्वात मोठे संकट म्हणजे 'सौर कचरा (Solar Waste) आणि बॅटरी स्टोरेज' हे आहे. सोलर पॅनल्सचे आयुष्य साधारणपणे २५ ते ३० वर्षे असते. त्यानंतर ते कचऱ्यात रूपांतरित होतात. या पॅनल्समध्ये सिलिकॉन, शिसे आणि कॅडमियमसारखे विषारी घटक असतात, ज्यांच्या शास्त्रीय विघटनाची (Recycling) कोणतीही भक्कम यंत्रणा सध्या भारतात उपलब्ध नाही. तसेच, रात्रीच्या वेळी वीज साठवून ठेवण्यासाठी लागणाऱ्या 'लिथियम-आयन बॅटरीज'च्या आयातीसाठी आपल्याला चीनसारख्या देशांवर अवलंबून राहावे लागत आहे, ज्यामुळे आर्थिक सुरक्षा धोक्यात येते. दुसरे मोठे आव्हान म्हणजे 'वितरण कंपन्यांची (DISCOMs) उदासीनता आणि उच्च प्रारंभिक खर्च' हे आहे. सर्वसामान्य गरीब नागरिकाला किंवा छोट्या दुकानदाराला सुरुवातीला सोलर सिस्टीम बसवण्यासाठी लाखो रुपयांचा खर्च करावा लागतो. यकृतावर आधारित सबसिडी मिळण्यासाठी आणि नेट मीटरिंगची (Net Metering) मंजुरी घेण्यासाठी वीज वितरण कंपन्यांच्या कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. लालफितीचा कारभार आणि भ्रष्ट यंत्रणेमुळे अनेक ग्रामीण भागात या योजनांची गती मंदावली आहे. या गंभीर आव्हानांवर मात करण्यासाठी आणि भारताला जगातील 'सौर महासत्ता' बनवण्यासाठी काही धोरणात्मक व कठोर पावले उचलणे अनिवार्य आहे. पहिली महत्त्वाची सुधारणा म्हणजे, केंद्र शासनाने देशातच 'सोलर पॅनल आणि बॅटरी मॅन्युफॅक्चरिंग हब' उभे करण्यासाठी स्वदेशी उद्योगांना विशेष आर्थिक पॅकेज (PLI Scheme) दिले पाहिजे, जेणेकरून परदेशी आयातीवरील अवलंबित्व संपेल. दुसरी महत्त्वाची सुधारणा म्हणजे, वीज वितरण कंपन्यांच्या (DISCOMs) प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता आणून 'सिंगल विंडो सिस्टीम'द्वारे नागरिकांना अवघ्या काही दिवसांत नेट मीटरिंग आणि सबसिडी मिळण्याची व्यवस्था केली पाहिजे. तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे, भविष्यात उद्भवणाऱ्या सौर कचऱ्याचा विल्हेवाट लावण्यासाठी 'राष्ट्रीय सौर कचरा धोरण' तात्काळ अमलात आणले पाहिजे. अंतिमतः, सूर्य हा ऊर्जेचा अक्षय स्रोत आहे, आणि त्याचा योग्य वापर करणे हे केवळ पर्यावरणाची गरज नसून ती देशाच्या आर्थिक स्वातंत्र्याची अट आहे. जेव्हा देशातील प्रत्येक घराचे छत आणि प्रत्येक शेताचा बांध सौर ऊर्जेने उजळून निघेल, तेव्हाच भारत खऱ्या अर्थाने एक 'हरित आणि स्वावलंबी राष्ट्र' बनेल. राज्यकर्त्यांनी आणि नागरिकांनी एकत्र येऊन या ऊर्जा क्रांतीला जनआंदोलनाचे रूप देणे हीच काळाची सगळ्यात मोठी मागणी आहे.



डॉ. माधव हिवाळे
मुख्य संपादक, दै. भारत संग्राम

समता, प्रज्ञा आणि करुणेच्या प्रकाशाची नवी क्षितिजे



भारतीय संस्कृतीचा इतिहास हा विविधते, सहिष्णुते आणि विचारी मंथनाचा प्रवाह आहे. येथे अनेक महापुरुष, विचारवंत आणि संत-परंपरांनी समाजाला दिशा दाखवली आहे. भारतात मोठ्या उत्साहात साजरा केला जाणारा 'दिवाळी' हा सण केवळ दिव्यांची रोषणाई नसून अंधाराकडून उजेडाकडे जाण्याचा अध्यात्मिक व सांस्कृतिक संदेश देतो. परंतु, जेव्हा आपण या सणाकडे आणि आपल्या महान इतिहासाकडे बौद्ध धम्माच्या व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टिकोनातून पाहतो, तेव्हा काही अत्यंत महत्त्वपूर्ण आणि वास्तववादी पैलू समोर येतात. बौद्ध परंपरेत 'दीपदान' आणि ज्ञानाच्या प्रकाशाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कोणत्याही प्रकारचा द्वेष किंवा तेढ न निर्माण करता, भूतकाळातील वास्तवाचा शोध घेणे आणि संविधानात्मक समतेच्या मार्गावर चालणे हीच खरी काळाची गरज आहे. याच पार्श्वभूमीवर बुद्ध धम्म, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि दीपोत्सवाचा सांस्कृतिक अन्वयार्थ जोडणारा हा एक सखोल आणि वास्तववादी विचारलेख.

भारतीय संस्कृतीत 'दीपोत्सव' किंवा 'दीपदान' हा केवळ एका विशिष्ट पौराणिक कथेपुरता मर्यादित नसून, तो प्राचीन काळापासून चालत आलेला एक सांस्कृतिक व बौद्धिक उत्सव आहे. बौद्ध वाङ्मयात आणि इतिहासात सम्राट अशोकाच्या काळामध्ये आणि बौद्ध विहारांमध्ये ज्ञानाच्या आणि प्रज्ञा-करुणेच्या प्रतीका रूपामध्ये 'दीपदान' मोठ्या प्रमाणावर केले जात असल्याचे उल्लेख आढळतात. जेव्हा भगवान बुद्ध कपिलवस्तु किंवा संकिसा येथे परतले, तेव्हा अनुयायांनी आणि नागरिकांनी दिव्यांची रोषणाई करून त्यांचे स्वागत केले होते, ही ऐतिहासिक व धार्मिक संदर्भकथा बौद्ध साहित्यात पाहायला मिळते. बुद्ध धम्माचा मूळ संदेश 'अत्तदीप भव' (स्वतःच स्वतःचे दिवे व्हा) हा आहे, ज्याचा अर्थ बाह्य प्रकाशापेक्षा अंतःकरणातील अज्ञानाचा अंधार दूर करणे हाच खरा प्रकाश आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बोधिसत्व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू धर्मशास्त्रामधील जातीव्यवस्था, विषमता आणि शोषणावर कठोर व तार्किक प्रहार केले. त्यांनी कोणत्याही एका सणाबद्दल किंवा परंपरेबद्दल केवळ धार्मिक अंधानुकरण करण्यापेक्षा मानवी हक्क, स्वाभिमान आणि समतेला सर्वोच्च प्राधान्य दिले. डॉ. आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या पवित्र भूमीत लक्षावधी अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली, तेव्हा त्यांनी स्पष्ट केले होते की, बौद्ध धम्म हा बुद्धी प्रामाण्यवाद, विज्ञाननिष्ठ, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारलेला आहे. बाबासाहेबांच्या मते, समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि अस्पृश्यतेचा अंधार जोपर्यंत नष्ट होत नाही, तोपर्यंत खरी दिवाळी किंवा खरा प्रकाश येऊ शकत नाही. त्यांनी नेहमीच असे शिकवले की, सण आणि उत्सव साजरे करताना त्यात मानवी मूल्यांची जपणूक झाली पाहिजे, शोषणाला थारा कामा नये आणि समाजातील शेवटच्या घटकाच्या चेहऱ्यावर आनंद फुलला पाहिजे. आजच्या आधुनिक काळात दिवाळी या सणाचे स्वरूप अतिशय व्यावसायिक (Commercial) आणि प्रदूषणकारी बनले आहे. कोटी-कोटी रुपयांचे फटाके फोडणे, पर्यावरणाचा संहार करणे, प्राण्यांना त्रास देणे आणि दिखाव्यासाठी प्रचंड पैसा उधळणे हे बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीच्या पूर्णपणे विरुद्ध आहे. ज्या समाजात आजही गरीब शेतकरी, कामगार आणि उपेक्षित घटक दोन वेळच्या अन्नासाठी संघर्ष करत आहेत, तिथे कोट्यवधी रुपयांची उधळण करणे कितपत योग्य आहे? हा प्रश्न आजच्या पिढीने स्वतःला विचारला पाहिजे. डॉ. आंबेडकरांनी नेहमीच आर्थिक सुव्यवस्था आणि नैतिक उच्चतेचा पुरस्कार केला. जर सणांच्या नावाखाली विषमता, अंधश्रद्धा आणि निसर्गाची हानी होत असेल, तर त्यावर कठोर आणि रोखठोक भाष्य करणे हे प्रत्येक सुसंस्कृत नागरिकाचे कर्तव्य ठरते. बौद्ध धम्माची नैतिकता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार आपल्याला असे शिकवतो की, खरा उत्सव तोच आहे जो मानवाला गुलामगिरीतून मुक्त करतो आणि त्याच्यामध्ये विवेक जागृत करतो. जेव्हा आपण दीपोत्सव साजरा करतो, तेव्हा तो केवळ मातीचा दिवा लावण्यापुरता मर्यादित नसावा, तर तो मनातील जातीभेद, वर्णभेद, द्वेष आणि अज्ञानाचा अंधार नष्ट करणारा असावा. सम्राटांच्या आणि महापुरुषांच्या विचारांचा प्रकाश जेव्हा घराघरांपर्यंत पोहोचेल, तेव्हाच या उत्सवांना खरा अर्थ प्राप्त होईल. इतिहास, बुद्ध धम्म आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार यांचा मेळ घालून जर आपण आत्मपरीक्षण केले, तर आपल्याला समजेल की बाह्य डामडौल आणि फटाक्यांच्या आवाजापेक्षा मनातील करुणेचा आणि ज्ञानाचा प्रकाश अधिक महत्त्वाचा आहे. समाजातली विषमता संपवून, सर्वसमावेशक, वैज्ञानिक आणि समतावादी समाज रचना निर्माण करणे हेच खऱ्या अर्थाने महापुरुषांना अभिवादन ठरेल. जेव्हा प्रत्येक नागरिकाच्या जीवनात ज्ञानाचा सूर्य उगवेल आणि शोषणाचे सावट दूर होईल, तेव्हाच या भूमीवर खऱ्या अर्थाने समता आणि बंधुतेची सुंदर पहाट उजाडेल.

रायगड जिल्ह्यातील टोरंट प्रकल्प



रमेश लांजेवार
नागपूर, ९९२१६९०७७९,

राज्यासह देशात विकासाच्या नावाखाली अंदाधुंद वृक्षांची कत्तल होत आहे.याचे जिवंत उदाहरण रायगड जिल्ह्यातील कर्जतमधील टोरंट प्रकल्प सर्वांच्या डोळ्यासमोर आहे. एकीकडे वृक्ष कटाईमुळे ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी कमी होत असुन सर्वांचा जीव गुदमरत आहे;तर दुसरीकडे प्रदूषणाचे प्रमाण वाढत आहे यामुळे मानव व पशुपक्षांचे जगणे कठीण झाले असून सर्वांच्याच आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.सध्याच्या परिस्थितीत देशासह राज्यात विकासाच्या नावाखाली वृक्षांची बेसुमार कटाईचा सपाटा जोरदार सुरू आहे त्यामुळे असे वाटत आहे की,देशात हे चाल्लय तरी काय! झाडांची अशीच कत्तल होत रहाली तर असे समजायला हरकत नाही की, माणसातील माणुसकी हरपली व मानुस माणुसकीत न रहाता जनावरापेक्षा निपत्तर झाला आणि माणुसकी संपुष्टात आली असे म्हणायला हरकत नाही.

आज सर्वांच्याच आरोग्याच्या दृष्टीने ज्याची नितांत गरज आहे अशा वृक्ष देवतेची व पृथ्वी मातेची सरकार व वनविभाग सरेआम अवहेलना करीत असून कत्तल करीत आहे.यामुळे मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीव-जंतुंनी स्वास घ्यायचा कसा असा गंभीर आणि जटील प्रश्न देशापुढे व देशाच्या १४५ कोटी जनतेपुढे उपस्थित होत आहे.आज आपल्यालाच नाही तर सर्वांनाच निसर्गामुळे म्हणजेच वृक्षांमुळे नैसर्गिक ऑक्सिजन मिळत आहे व सर्वत्र सुखशांती दिसून येते.परंतू देशासह राज्यात अनेक प्रकल्प उभारून प्रदूषणामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने संपूर्ण पृथ्वीतलावरील जीवजंतूचा जीव धोकादायक स्थितीत येऊन ठेपला आहे.सरकारने गेल्या काही वर्षांत निसर्गाचे संपूर्ण वाटोळे केले असून त्याचा परिणाम म्हणून,वनवे लागने,भुस्खलन,अती उष्णता,पिण्याच्या पाण्याची पातळी कमी होणे इत्यादी अनेक समस्यांनमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून यांचे गंभीर परिणाम अलनिनोच्या माध्यमातून राज्यासह देशात दिसत आहे. सरकारने अनेक प्रकल्पांचा सपाटा लावला असला तरी अनेक प्रकल्पांच्या तुलनेत वृक्षलागवड नगन्य असल्याचे दिसून येते. कारण प्रश्न असा उद्भवतो की, जमीनीवर अवाढव्य प्रकल्प उभारल्यानंतर सरकार झाडे लावणार कुठे? सरकार प्रकल्प उभारल्यानंतर झाडे लावण्याचे जे दावे करतात ते संपूर्ण दावे खोटे व फोल असल्याचे मी समजतो आणि हेच काम सरकार कर्जत तालुक्यातील टोरंट पॉवर प्रकल्पाच्या बाबतीत करीत आहे.सरकार म्हणते की, टोरंट प्रकल्पाला लागणारी २५३ हेक्टर जमीनीच्या बदलत्या, दुसऱ्या २५३ हेक्टर पर्यायी जमिनीवर ९० हजार झाडे लावणार असल्याचे सरकार सांगत आहेत.मला हे समजत नाही की,जमीन काय झाडांना लागते का? अचानक २५३ हेक्टर जमीन सरकार उपलब्ध करून देणार कोठून आणि आता लावलेली झाडे मोठी व्हायला कमीत कमी दहा वर्षे लागतील याचा विचार सरकार का करीत नाही?सरकारच्या या प्रकल्पावरून सिध्द होते की, सरकार जी झाडे लावण्याची गोष्ट करीत आहे ती फक्त कागदावरच राहिल कृतीत होने कदापि शक्य नाही असे माझे स्पष्ट मत आहे.जो रायगड जिल्हा जगप्रसिद्ध आहे व ज्या भुमित शिवाजी महाराजांचा इतिहास दडलेला आहे अशा हिरवागार गालिचा सरकार विकासाच्या नावाखाली नेस्तनाबूत करीत असेल तर ही बाब कोन्हिही सहन करणार नाही.सरकारने जर जबरदस्तीने वृक्षतोड केली तर,संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठल्या शिवाय रहाणार नाही ही बाब सरकारने व वनविभागाने लक्षात ठेवली पाहिजे. देशातील काही राज्यांत ओला दुष्काळ तर काही राज्यांत कोरडा दुष्काळ दिसून येत आहे. एवढे सर्व गंभीर परिणाम पृथ्वीवर सरकारला दिसत असून सुद्धा नवीन प्रकल्पाच्या उभारणीसाठी लाखों वृक्षांची कत्तल सरकार करण्याच्या तयारीत सरकार आहे ही अत्यंत शरमेची आणि लाजिरवाणी बाब म्हणावी लागेल.रायगड जिल्ह्याच्या कर्जत तालुक्यातील टोरंट कंपनीचा पंप स्टोरेज ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी सरकारची मोठ्या प्रमाणात खटाटोप सुरू आहे. परंतु या प्रकल्पामुळे राज्याला व राज्यातील जनतेला किती मोठे नुकसान होणार आहे याकडे सरकार दुर्लक्ष करीत आहे ही अत्यंत दुर्दैवी बाब म्हणावी लागेल.सह्याद्रीच्या कुशीत खुप काही दडलेले आहे त्यावर सरकारने जर वक्र नजर टाकली तर राज्य विनाशाच्या उंबरठ्यावर येऊ शकते यालाही नाकारता येत नाही.सह्याद्रीच्या जंगलात सुरू असलेल्या वृक्षतोडीचा संबंध प्रामुख्याने रायगड जिल्ह्यातील कर्जत जवळील सायडोंगर परिसरात एका मोठ्या ऊर्जा प्रकल्पाशी आहे. 'टोरंट पॉवर' या कंपनीच्या ३,००० मेगावॅट क्षमतेच्या 'पंप स्टोरेज हायड्रो प्रोजेक्ट'साठी मोठ्या प्रमाणावर झाडे कापण्यास वन विभागाने परवानगी दिली आहे, वनविभाग झाडे लावण्याचे काम करतात की तोडण्याचे काम करतात ही बाब आमजनतेच्या समजण्यापलीकडची आहे. त्यामुळे आता राज्यासह देशात वनविभाग रहाला नसून वनकत्तल विभाग झाला की काय असे चित्र दिसत आहे. त्यामुळे याकरिता जनतेचा मोठा आक्रोश सुरू आहे. रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील सायडोंगर क्षेत्र, जे भीमाशंकर वन्यजीव अभयारण्याच्या बफर झोनच्या किंवा जंगलाच्या जवळ आहे. या प्रकल्पासाठी जवळपास २५३ हेक्टर वन जमीन वळवण्यात येत आहे.सरकारी आणि वन विभागाच्या कागदपत्रांनुसार ३२,४९० झाडे तोडण्यास मंजुरी देण्यात आली आहे. परंतु हा आकडा ५० हजारांच्या वर असू शकतो यालाही नाकारता येत नाही.आज ५० वर्षे जुनी ३२४९० झाडांपासून मिळणारी शुद्ध हवा आणि ऑक्सिजन वृक्ष कटाईनंतर मिळणार कोठून आणि त्या झाडाच्या सान्निध्यात रहाणाऱ्या पशुपक्ष्यांचे काय होणार याचा विचार सरकारने केला का?सरकार प्रकल्प उभारणीच्या पुर्ण तयारीत आहे.त्या अनुषंगाने सरकार वनविभाला २५३ हेक्टर पर्यायी जमीन देणार असल्याचे सांगितले जाते व त्यावर ९० हजार झाडे लावणार असल्याचे म्हटले जाते.यावर मी सरकारला प्रश्न विचारतो की,२५३ हेक्टर जमीन आणणार कोठून; २५३ हेक्टर जमीनीची भरपाई करण्यासाठी सरकार राजकीय पुढाऱ्यांजवळ असलेल्या शेकडो हेक्टर जमीनीतुन देणार का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.आज राजकीय पुढाऱ्यांजवळ वाममार्गाने कमविलेली शेकडो हेक्टर जमीन आहे त्यावर सरकार वृक्ष लागवड का करीत नाही? सरकार म्हणते की,स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून त्यातून मार्ग काढला जाईल, सरकार प्रकल्पासाठी हजारो झाडे कापण्याच्या तयारीत आहे आणि ग्रामस्थांशी चर्चा करण्याची भाषा करतात हा सर्व सरकारचा लपंडाव सुरू असल्याचे दिसून येते.जर शिवरायांचा इतिहास आणि जागतिक वारसा जीवीत ठेवायचा असेल तर, टोरंट प्रकल्पाला थांबविण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्राने पेटून उठले पाहिजे व यापुढे टोरंट सारखे प्रकल्प थांबवुन निसर्ग वाचविला पाहिजे आणि याचे पालन वनविभागाने सुध्दा केले पाहिजे.कारण आज जंगल तोडीमुळे अनेक पशुपक्षांचे घरे उद्ध्वस्त झाली आहेत व त्यांच्या जिवाला मोठा धोका निर्माण झाला आहे याची जाणीव सरकारने व वनविभागाने ठेवली पाहिजे.सरकारने प्रकल्प अवश्य उभारावे याला कोणाचाही विरोध नाही.परंतु निसर्गाची राखरांगोळी होणार नाही याचीही खबरदारी सरकारने घेतली पाहिजे.कारण एक झाड मोठे व्हायला कमीत कमी ५ ते १० वर्षाचा कालावधी लागतो म्हणजे(१८२५ ते ३६५० दिवस)आणि ५ ते १० वर्षाचा कालावधी म्हणजे कमी नाही याची जाणीव सरकारने ठेवली पाहिजे.आज सरकार मोठ्यांने दावे करीत आहे की, आम्ही मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करीत आहोत.परंतु सत्यपरिस्थिती अशी आहे की, फक्त फोटो सेशन पुरते वृक्षारोपण असते त्यानंतर त्या वृक्षांकडे कोणताही राजकीय पुढारी ढुंकूनही पाहत नाही ही सत्य परिस्थिती आहे. त्यामुळे सरकारच्या मार्फत होणारे ९० टक्के वृक्षारोपण हे फक्त कागदावरच असते व १० टक्के वृक्षारोपण जमिनीवर होते.त्यामुळे सरकारच्या करणीत आणि कथनीमध्ये जमीन-आसमानचा फरक आहे.टोरंट पॉवर प्रकल्प भीमाशंकर वन्यजीव अभयारण्यापासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर, तर भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिरापासून २० किलोमीटर अंतरावर जरी असला तरी या प्रकल्पाचा मोठा धोका वन्यजीव प्राण्यांना व पर्यटकांना होईल यात तिळमात्र शंका नाही.आज वृक्षतोडीमुळे अनेक औषधीयुक्त वृक्ष लुप्त झाली आहेत व काही झाडे लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.त्याचप्रमाणे अनेक पशुपक्षी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत किंवा त्यांची संख्या कमी झाली आहे.अशी भयावह गंभीर परिस्थिती वृक्षतोडीमुळे राज्यासह देशात निर्माण झाली आहे.त्यामुळे सरकारने वन्यप्राण्यांची घरे उद्ध्वस्त होणार नाही व त्यांच्या जीवाला धोका निर्माण होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे; सोबतच हवामानातील वाढता बदल पहाता व स्थल ,जल, वायू प्रदूषणाचा वाढता प्रभाव लक्षात घेता निसर्गाची जोपासना करण्याचा संकल्प सरकारने घेतला पाहिजे व टोरंट प्रकल्पाला ताबडतोब स्थगिती देऊन निसर्गाचे व वन्यप्राण्यांचे रक्षण व्हायला हवे.

दैनिक भारत संग्राम, वाशिम RNI No. MAHMAR/2020/79677
हे वृत्तपत्र प्रकाशक महादा आश्रु हिवाळे यांच्याद्वारे दैनिक भारत संग्राम कार्यालय, वार्ड नं. डब्ल्यु३, प्रॉपर्टी नं. ७५७, महामाया निवास, नालंदानगर, वाशिम ता. जि. वाशिम ४४४५०५ (महाराष्ट्र) येथून मालक महादा आश्रु हिवाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक महादा आश्रु हिवाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक अशफाक बेग खान बेग यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स, फेज २, प्लॉट नं. डी-२०, पोलीस स्टेशन रोड, लोकेश दाल मिलच्या समोर, अकोला ता.जि. अकोला ४४४१०४ (महाराष्ट्र) येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास वाशिम न्यायालया अंतर्गत)

दैनिक
भारत संग्राम
विदर्भ
मातीची ओळख... विकासाची दिशा...
३
गुरुवार,
दि. ०५ नोव्हेंबर २०२६

थोडक्यात

जिल्ह्यात पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

बुलढाणा : जिल्ह्यात यंदा झालेल्या कमी पावसामुळे भूजल पातळीत घट झाली असून, आगामी उन्हाळ्यात संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. मानवी जीवनासह पशुधनासाठी पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार विविध निर्बंध व निर्देश जारी केले आहेत. सार्वजनिक पाणी स्रोतांच्या ५०० मीटर परिसरात नवीन विहीर, बोरवेल खोदण्यास बंदी : जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागांमध्ये सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतापासून ५०० मीटरच्या परिघात खाजगी अथवा व्यावसायिक वापरासाठी नवीन विहीर किंवा कूपनलिका (बोरवेल) खोदण्यास पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. तसेच या परिघाबाहेरही नवीन विहीर अथवा बोरवेल खोदण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.
जलप्रकल्पांतील पाणीसाठा पिण्यासाठीच राखीव : जिल्ह्यातील सर्व लहान, मध्यम व मोठ्या शासकीय जलप्रकल्पांसह नद्या, नाले आणि कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांमधील उपलब्ध पाणीसाठा केवळ पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. टँकर भरणे तसेच प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनांसाठी या पाण्याचा वापर करण्यात येणार आहे. याशिवाय जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर सुरू असलेले तसेच नव्याने सुरू होणारे स्विमिंग टँक आणि तरणतलाव बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पाणी वापरात किमान १० टक्के कपात करण्याचे निर्देश : जिल्ह्यातील सर्व नगरपालिका, नगरपंचायती, ग्रामपंचायती आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा. पाणीगळती रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात तसेच नागरिकांमध्ये पाणी बचतीबाबत व्यापक जनजागृती करावी. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी पाणी वापरामध्ये किमान १० टक्के कपात करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सांडपाणी प्रक्रिया केंद्रांचा पूर्ण क्षमतेने वापर करून प्रक्रिया केलेले पाणी सार्वजनिक उद्याने, बागा, धुलाई तसेच औद्योगिक कामांसाठी वापरण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. यामुळे पिण्याच्या पाण्यावरील अतिरिक्त ताण कमी होण्यास मदत होणार आहे.
आदेशाचे उल्लंघन केल्यास फौजदारी कारवाई : जिल्हा प्रशासनाने लागू केलेल्या प्रतिबंधात्मक आदेशांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती, संस्था अथवा कंत्राटदारांविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ तसेच महाराष्ट्र भूजल अधिनियम, २००९ मधील संबंधित तरतुदींनुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे. नियमांचे उल्लंघन करून पाणी उपसा करणाऱ्यांची पंप, पाईपलाईन, बोरवेल खोदाई यंत्रे आदी साधने जप्त करण्याचीही कारवाई करण्यात येणार आहे.
संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी उपलब्ध जलसाठ्याचे योग्य नियोजन, भूजल स्रोतांचे संरक्षण आणि पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. त्यामुळे नागरिक, शेतकरी, व्यावसायिक तसेच सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्रशासनाच्या निर्देशांचे पालन करून पाणी बचतीच्या प्रयत्नांना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

केळी फळपीक विमा हप्ता भरण्यास १५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

बुलढाणा : पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना आंबिया बहार २०२६-२७ अंतर्गत केळी फळपिकाचा विमा हप्ता भरण्यास शासनाकडून १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्यामार्फत देण्यात आली आहे.
या योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या केळी उत्पादक शेतकऱ्यांना विमा अर्ज दाखल करून विमा हप्ता भरण्यासाठी अतिरिक्त मुदत उपलब्ध करून देण्यात आली आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त केळी उत्पादक शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा. विहित मुदतीत विमा अर्ज सादर करून विमा हप्ता भरावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

पाणी व चारा टंचाई निवारणासाठी सर्वांचे प्रयत्न आवश्यक – केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे



बुलढाणा : जिल्ह्यात संभाव्य पाणीटंचाई आणि चारा टंचाईची परिस्थिती लक्षात घेता पशुधनासाठी आतापासूनच चाऱ्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. केंद्र पुरस्कृत 'जी रामजी' योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना लाभ देऊन जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर चारा लागवड करावी. संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासनासह सर्व घटकांनी समन्वयाने प्रयत्न करावेत, असे निर्देश केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिले.
जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पाणीटंचाई व चारा व्यवस्थापनाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार श्वेता महाले, जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे, माजी आमदार संजय रायमुलकर यांच्यासह जलसंधारण, मृद व जलसंधारण, कृषी आणि पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत विविध विभागांच्या कामांचा आढावा घेत आगामी काळातील संभाव्य पाणी व चारा टंचाईवर मात करण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पशुसंवर्धन विभागामार्फत चारा लागवडीसाठी शेतकऱ्यांना बियाण्यांचे वाटप करण्यात आले आहे. या बियाण्यांची प्रत्यक्ष पेरणी झाली आहे किंवा नाही, याची माहिती कृषी सहाय्यक व तलाठ्यांमार्फत संकलित करावी. संकलित करून त्यांचा पशुखाद्य म्हणून वापर करावा. उपलब्ध चाऱ्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी पशुपालकांना मार्गदर्शन करावे. चारा संवर्धन, मुरघास निर्मिती, चाऱ्याची योग्य साठवणूक आणि पीक अवशेषांचे पोषणमूल्य वाढविण्याबाबत प्रशिक्षण व जनजागृती करावी, असेही त्यांनी सांगितले. पशुधनाची संख्या आणि उपलब्ध चाऱ्याचा साठा यांचा विचार करून भविष्यातील चारा लागवड झालेल्या क्षेत्राची तालुकानिहाय माहिती आठ दिवसांत सादर करावी. ग्रामस्तरावर चारा लागवडीचे नियोजन करून भविष्यात टंचाई निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. खरीप हंगामात पावसाची झालेली तूट आणि त्याचा पिकांच्या उत्पादनावर झालेला परिणाम लक्षात घेता चारा व्यवस्थापनाला प्राधान्य देण्याची गरज आहे. खरीप पिकांची काढणी झाल्यानंतर शेतात शिल्लक राहणारे सोयाबीनचे कुटार, तुरीचे कुटार तसेच अन्य पिकांचे अवशेष गरजेनुसार नियोजन करावे. सिंचनाची सुविधा असलेल्या शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात ज्वारीसह अन्य चारा पिकांची लागवड करावी. आगामी काळात जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करण्याची वेळ येऊ शकते. ही संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने आतापासूनच आवश्यक पूर्वतयारी करावी, असे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री जाधव यांनी दिले. जलसंधारणाच्या कामांना गती द्या : पाणीटंचाईवर मात करण्यासाठी तालुकास्तरावर विविध विभागांनी समन्वयाने जलसंधारणाची कामे हाती घ्यावीत. नद्यांचे खोलीकरण, तलावांतील गाळ काढणे, नाले खोलीकरण, पांदण रस्त्यांची निर्मिती, शेततळ्यांची निर्मिती तसेच माथा ते पायथा जलसंधारणाची कामे यांचे सूक्ष्म नियोजन करावे. उपलब्ध योजनांच्या माध्यमातून ही कामे प्रभावीपणे राबवून पावसाचे पाणी जास्तीत जास्त प्रमाणात अडविणे व जमिनीत जिरविण्यावर भर द्यावा, असेही त्यांनी सांगितले. पाणीपुरवठा यंत्रणा सज्ज ठेवा : जिल्ह्यातील पाणीटंचाईची परिस्थिती गंभीर असल्याने सर्व विभागांनी सजग राहून पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करावी. जिल्ह्यात उभारण्यात आलेले पाणी शुद्धीकरण (फिल्टर) प्लांट स्वच्छ करून कार्यान्वित स्थितीत ठेवावेत. या केंद्रांवरील पाणीपुरवठा आणि वीजपुरवठ्याच्या अनुषंगाने आवश्यक नियोजन करावे. तसेच इलेक्ट्रिशियनची उपलब्धता सुनिश्चित करून पाणीपुरवठा यंत्रणेत कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. दुष्काळसदृश परिस्थिती, शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना, विविध विभागांच्या योजना आणि नागरिकांसाठी उपलब्ध सुविधांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी जनजागृती करावी. शेतकरी आणि नागरिकांना शासनाच्या उपाययोजनांची माहिती वेळेत मिळेल, यासाठी सर्व विभागांनी समन्वय ठेवावा, असे आवाहनही केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले. संभाव्य पाणीटंचाई आणि चारा टंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनातील प्रत्येक विभागाने जबाबदारीने काम करावे. पाण्याचा काटकसरीने वापर, जलसंधारण, चारा लागवड आणि उपलब्ध संसाधनांचे योग्य व्यवस्थापन या बाबींना प्राधान्य देऊन आगामी परिस्थितीचा सामना करण्यासाठी सज्ज राहावे, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

प्लॉट फसवणूक प्रकरणातील पीडितांनी पुराव्यांसह आर्थिक गुन्हे शाखेत हजर राहावे

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

बुलढाणा : मोताळा येथील विकसित केशव नगर परिसरातील प्लॉट खरेदी-विक्री व्यवहारात फसवणूक झाल्याच्या प्रकरणाचा तपास बुलढाणा पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे. या प्रकरणातील इतर पीडित प्लॉटधारकांनी साक्षीदार म्हणून पुढे येऊन आपले जबाब नोंदवावेत, असे आवाहन आर्थिक गुन्हे शाखेने केले आहे.
मलकापूर येथील शत्रुघ्न दौलत धांडे यांच्या तक्रारीवरून नंदराम आत्माराम काळे व इतर आरोपींविरुद्ध बोराखेडी पोलीस ठाण्यात २९ ऑक्टोबर २०२६ रोजी गुन्हा क्रमांक ५३२/२०२६, भारतीय दंड विधान कलम ४२० व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांच्या आदेशाने आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे. या प्रकरणात केशव नगर, मोताळा येथील ज्या प्लॉटधारकांची फसवणूक झाली आहे, त्यांनी साक्षीदार म्हणून आपले जबाब नोंदविण्यासाठी पुढे यावे. संबंधितांनी प्लॉट खरेदीसंदर्भातील आवश्यक कागदपत्रे, इसार पावती, रक्कम हस्तांतरणाचे पुरावे तसेच इतर संबंधित दस्तऐवजांसह आर्थिक गुन्हे शाखा, बुलढाणा येथे ७ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत हजर राहावे. या प्रकरणाच्या तपासाला सहकार्य करून आपल्याकडील आवश्यक माहिती व पुरावे पोलिसांना उपलब्ध करून द्यावेत, असे आवाहन आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रवी राठोड यांनी केले आहे.

सुलतानपूरमध्ये भरदिवसा धाडसी चोरी

मंडळ अधिकाऱ्यांच्या चारचाकीतून ५० हजारांची रोकड

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रणव वराडे



लोणार : सुलतानपूर शहरातील गजबजलेल्या चौकात भरदिवसा चोरीची धक्कादायक घटना घडली. वाहतूक कोंडीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने मंडळ अधिकारी लक्ष्मण नारायण सानप यांच्या चारचाकी वाहनातून ५० हजार रुपये रोख, शासकीय लॅपटॉप आणि महत्त्वाची प्रशासकीय कागदपत्रे असलेली बॅग लंपास केली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंडळ अधिकारी लक्ष्मण सानप यांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम असल्याने ते मेहकर येथून स्वतःच्या चारचाकी वाहनाने लोणारकडे जात होते. सकाळी सुमारे ११ वाजता त्यांचे वाहन सुलतानपूर शहरात दाखल झाले. यावेळी रस्त्यावर मोठ्या प्रम णात वाहतूक कोंडी झाल्याने त्यांचे वाहन गर्दीत अडकले होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने वाहनातील बॅग नजर चुकवून लंपास केली या बॅगेमध्ये ५० हजार रुपयांची रोख रक्कम, कार्यालयीन लॅपटॉप तसेच महत्त्वाच्या शासकीय फाईल्स व कागदपत्रांचा समावेश होता. वाहतूक सुरळीत झाल्यानंतर काही वेळाने बॅग चोरीला गेल्याचे सानप यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी पोलिसांना घटनेची माहिती दिली घटनेची माहिती मिळताच सुलतानपूर बीटचे पोलीस हेड कॉन्स्टेबल शिवानंद केदार, राजेश जाधव आणि एपीआय अवचार यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिसराची पाहणी केली असून, परिसरातील सीसीटीव्ही फ टेजच्या आधारे अज्ञात चोरट्याचा शोध सुरू केला आहे. शहरातील मुख्य वर्दळीच्या ठिकाणी भरदिवसा चोरी झाल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. पोलिसांनी या घटनेचा तातडीने तपास करून चोरीचा छडा लावावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे .

मिरवणूक काढता आली नाही म्हणून ईगो दुखावला का?

भारत संग्राम | प्रतिनिधी

कोल्हापूर/मुंबई : कोल्हापूरच्या राजकारणाचा केंद्रबिंदू असलेल्या 'गोकुळ दूध संघा'च्या निवडणुकीवरून राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सतेज ऊर्फ बंटी पाटील यांच्या नेतृत्वाखालील समविचारी आघाडीने या निवडणुकीत बहुमत मिळवले असताना, राज्य सरकारकडून तज्ज्ञ (शासकीय) सदस्यांची नियुक्ती करून गोकुळवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप होत आहे. यावरून आता राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) नेते आणि आमदार रोहित पवार यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. त्यांनी या हस्तक्षेपाला 'विनाशकाले विपरीत बुद्धी' म्हणत, सतेज पाटील यांना भक्कम पाठिंबा दर्शवला आहे.
आपल्या अधिकृत सोशल मीडिया खात्यावरून पोस्ट करत रोहित पवार यांनी सरकारवर हल्लाबोल केला. ते म्हणाले, "'गोकुळ'च्या निवडणुकीत साडेपाच लाख सभासदांनी दिलेले जनमत बाजूला सारून शासकीय सदस्य नेमत गोकुळ ताब्यात घेण्याचा डाव म्हणजे 'विनाशकाले विपरीत बुद्धी' असंच म्हणावं लागेल. निकालाच्या दिवशी कोल्हापुरात राहून मिरवणूक काढता आली नाही म्हणून तुमचा ईगो दुखावला असेल, तर मग काय शासकीय सदस्य नेमून लोकमताशी छेडछाड करण्याचा प्रयत्न करणार का? सरकारचा हा निर्णय म्हणजे निव्वळ अराजकता आहे." गोकुळचा विषय केवळ बंटी पाटील आणि कोल्हापूरपुरता मर्यादित नाही, तर तो लोकशाही आणि संविधानावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाचा आहे. आज यांनी गोकुळमध्ये रडीचा डाव केला, उद्या लोकसभा निवडणूक पराभूत झाल्यावरही हे रडीचा डाव खेळतील. त्यामुळे हे असले विषारी साप आताच ठेचले पाहिजेत," असा घणाघात रोहित पवार यांनी केला.

नगरपंचायत मालेगाव पाणीपुरवठा योजनेच्या कामांची पाहणी!

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रदीप सावले

मालेगांव : - वाशिम जिल्ह्यात तसेच मालेगाव शहरात व परिसरात यावर्षी झालेल्या कमी पावसामुळे तसेच धरणातील उपलब्ध असलेल्या पाणीसाठा जलस्त्रोत कुरळा प्रकल्प येथे तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजना मधील जलशुद्धीकरण केंद्र येथे सुरू करण्यात आलेल्या कामांची पाहणी करण्यात आली सदर काम करतेवेळी सद्यस्थितीत सुरू असलेला पाणीपुरवठा पूर्वीप्रमाणेच रहावा तो विस्कळीत होणार नाही याबाबत काळजी घेण्याचे निर्देश त्यांनी कंत्राटदार यांना दिले धरणातील अत्यल्प पाणीसाठा यामुळे शहरात भविष्यात उन्हाळ्यामध्ये पाणीटंचाई जाणवू नये याकरिता तातडीची उपाययोजना म्हणून सुकांडा प्रकल्प येथून कुरळा येथील जॅकवेलमध्ये पाईपलाईन द्वारे पाणीपुरवठा योजना तसेच मालेगाव शहरातील विविध वार्डामध्ये उपलब्ध असलेल्या विंधन विहिरी व विहिरीवरून त्या त्या भागातील पाणीपुरवठा करण्याकरिता पाईपलाईन ची कामे मंजूर करण्याबाबत नगरपंचायत विशेष सभा दिनांक 2 नोव्हेंबर रोजी घेण्यात आली त्यानुसार जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याचे नगरपंचायत प्रशासनाचे नियोजन आहे पाहणीचे वेळी पाणीपुरवठा सभापती आझाद खान पठाण,सनी घुगे,अभिराज घुगे,संजय सारडा,अंकुश गुजरे,गजानन काळे,उपस्थित होते
तसेच अत्यल्प पाणीसाठ्यामुळे,आगामी काळात आपल्या शहरासमोर अभूतपूर्व दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण होऊन शहरात गंभीर पाणीटंचाईचे आव्हान निर्माण होऊ शकते.
त्यामुळे आजपासूनच पाण्याचा काटकसरीने आणि जपून वापर करणे बाबतचे आवाहन शहरातील नागरिकांना नगरपरिषद प्रशासन मार्फत करण्यात येत आहे.

मुंबई ही स्वप्नांची महानगरी म्हणून ओळखली जाते; परंतु ही नगरी जितकी भव्य दिसते, तितकीच ती वास्तवात संघर्षमय आहे. दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या आणि आकाशाला भिडलेली महागाई यामुळे या मायानगरीत येण्याचे स्वप्न आता अनेकांसाठी अत्यंत कठीण झाले आहे. जे लोक यापूर्वीच येथे नोकरीनिमित्ताने आले आणि स्थिरावले, त्यांनी आपले बस्तान बसवले; परंतु आज ज्यांना कामानिमित्ताने, स्पर्धा परीक्षांसाठी किंवा वैद्यकीय उपचारांसाठी मुंबईत अल्पमुदतीसाठी यावे लागते, त्यांच्यासमोर निवासाचा मोठा प्रश्न उभा ठाकतो. महागाईच्या या काळात खासगी हॉटेल्स किंवा लॉजमध्ये राहणे सर्वसामान्यांना आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. याच वास्तवाचे भान ठेवून, आपल्या हक्काची आणि सुरक्षित तात्पुरत्या निवासाची जागा (बुलढाणा भवन) या स्वप्नांच्या महानगरीत असावी, हे आज बुलढाणा जिल्ह्यातील अनेक नागरिकांचे स्वप्न बनले आहे.

मुंबईत 'बुलढाणा भवन' उभारणीचा संकल्प

मुंबईत 'बुलढाणा भवन' च्या उभारणीच्या मागणीने आता जोर धरला असून, महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईत असे हक्काचे बुलढाणा भवन खऱ्या अर्थाने असायलाच हवे, ही काळाची गरज बनली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील असंख्य नागरिक आज विविध क्षेत्रांत मुंबईत कार्यरत असून त्यांची संख्या मोठी आहे. याच पार्श्वभूमीवर, सर्वांच्या सहकार्यातून मुंबईत 'बुलढाणा भवन' उभे राहावे, यासाठी आता ठोस प्रयत्न सुरू झाले आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील एखादा सर्वसामान्य नागरिक आजारी पडल्यास त्याला उपचारासाठी मुंबईसारख्या मोठ्या शहरात धाव घ्यावी लागते. मात्र, तिथे पोहोचल्यानंतर 'राहायचे कुठे?' असा बिकट प्रश्न निर्माण होतो. अशा वेळी उपचार कालावधीत राहण्यासाठी एक हक्काचे बुलढाणा भवन उपलब्ध झाल्यास मोठा दिलासा मिळू शकतो. तसेच पोलीस भरती, रेल्वे परीक्षा, आरोग्य विभाग किंवा इतर स्पर्धा परीक्षा देण्यासाठी ग्रामीण भागातून येणाऱ्या मुला-मुलींना अल्पमुदतीसाठी योग्य निवासाची सोय उपलब्ध व्हावी, ही पालकांचीही इच्छा असते. एवढेच नव्हे, तर शैक्षणिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक कार्यक्रमांच्या निमित्ताने अनेक लोक शिक्षक, कवी, लेखक आणि कलाकार मुंबईत येतात; त्यांनाही अशा बुलढाणा भवनात हक्काच्या निवासाची सोय उपलब्ध होणे गरजेचे आहे. याच उदात्त हेतूने हे स्वप्न वास्तवात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या सर्व संकल्पनेतून एक विशेष योग जुळून आला. ७० व्या धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमी, नागपूर येथे जमलेल्या 'बुलढाणा बौद्ध समाज मंडळ'च्या पदाधिकाऱ्यांच्या विचारविनिमयातून 'बुलढाणा भवन' च्या उभारणीला अधिक चालना मिळाली. या प्रकल्पाचे मुख्य सूत्रधार आणि बुलढाणा जिल्हा बौद्ध समाज मंडळ संस्थेचे अध्यक्ष तथा खारघर येथील भारती विद्यापीठ इंजिनिअरिंग कॉलेजचे विभागप्रमुख (HOD) डॉ. दयानंद इंगळे. हे केवळ स्वतःच्या हिताचा विचार करणे, स्वार्थ साधणे आणि स्वतःपुरते जगणे, हे त्यांच्या संस्कारात कधीही नव्हते. समाजातील वंचित आणि उपेक्षितांपर्यंत पोहोचून त्यांना न्याय मिळवून देणे आणि त्यांच्या सुखात सहभागी होणे, हे त्यांचे मूलभूत जीवनध्येय राहिले आहे. मुंबईत हे बुलढाणा भवन साकार व्हावे, यासाठी ते अहोरात्र प्रयत्नशील आहेत. याच विचारमंथनादरम्यान, आपल्या क्रांतिकारी शाहिरी स्वरांनी आणि ओघवत्या वाणीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार घराघरांपर्यंत पोहोचवणाऱ्या प्रसिद्ध गायिका भीमकन्या अंजलीताई भारती यांची भेट घेण्याची संधी त्यांना मिळाली. बुद्ध, फुले, शीव, शाहू, आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी चळवळीचा विचार आपल्या गीतांतून देशभर पोहोचवणाऱ्या अंजलीताईंसमोर पदाधिकाऱ्यांनी बुलढाणा भवन उभारण्याचे स्वप्न मांडले. अंजलीताईंनीही क्षणाचाही विलंब न लावता या लोककल्याणकारी मागणीला उत्स्फूर्त पाठिंबा दिला. "आपण नक्कीच बुलढाणा भवन उभे करूया!" असे म्हणत त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आणि या महनीय कार्यासाठी स्वतः एक 'चारिटी शो' आयोजित करण्यास होकार दिला. त्यानुसार, आगामी ८ डिसेंबर २०२६ रोजी मुंबईतील षण्मुखानंद हॉल येथे या भव्य सांस्कृतिक व चारिटी शोचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक एकात्मतेचा, स्वाभिमानाचा आणि उज्ज्वल भविष्याचा पाया रचणाऱ्या या सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, ८ डिसेंबर २०२६ रोजी सर्वांनी या ऐतिहासिक कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. दयानंद इंगळे, ॲड. आर. एन. वानखेडे, प्राचार्य बी. बी. पवार, ॲड. वामन मोरे तसेच संस्थेचे प्रमुख मार्गदर्शक विजय खरात यांच्या बहुमूल्य विचारविनिमयातून आणि संकल्पनेतून या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन झाले आहे. त्यांनीच हे बुलढाणा भवन उभारण्याचे स्वप्न पाहिले असून ते पूर्वत्वास नेण्यासाठी सतत प्रयत्न चालू आहेत. या पवित्र कार्यात प्रत्येक बुलढाणावासीयाने आपला हातभार लावणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच ८ डिसेंबर रोजीच्या कार्यक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन ॲड. आर. एन. वानखेडे यांनी केले आहे.

विकास सुखधाने, साहित्यिक
नांद्रा, ता. मेहकर, जि. बुलढाणा

दैनिक
भारत संग्राम

बुलडाणा जिल्हा

समृद्ध परंपरा... प्रगतीचा नवा अध्याय...

पान क्र. 4

गुरुवार, दि. ०५ नोव्हेंबर २०२६



थोडक्यात

रब्बी हंगाम:प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी व्हा-कृषी विभागाचे आवाहन

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

बुलढाणा : नैसर्गिक आपत्ती, प्रतिकूल हवामान आणि विविध कारणांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण मिळावे, तसेच त्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राहावे, यासाठी राज्य शासनामार्फत सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. खरीप २०२६ आणि रब्बी हंगाम २०२६-२७ या एक वर्षाच्या कालावधीसाठी ही योजना अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी लागू करण्यात आली आहे. रब्बी हंगामात जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होऊन आपल्या पिकांचा विमा उतरवावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. रब्बी हंगाम २०२६-२७ मध्ये गहू (बागायत), हरभरा, रब्बी कांदा आणि उन्हाळी भुईमूग या चार पिकांचा योजनेत समावेश करण्यात आला आहे. अधिसूचित महसूल मंडळ अथवा क्षेत्रातील शेतकऱ्यांना या योजनेत सहभाग घेता येणार आहे. कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी योजनेतील सहभाग ऐच्छिक ठेवण्यात आला आहे. गहू (बागायत), हरभरा आणि रब्बी कांदा या पिकांसाठी विमा योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत १५ डिसेंबर २०२६ आहे. तर उन्हाळी भुईमूग पिकासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत नोंदणी करता येणार आहे. योजनेसाठीचे प्रधानमंत्री पीक विमा पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे. कर्जदार शेतकऱ्यांना पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी संबंधित कर्ज मंजूर करणाऱ्या बँकेमार्फत विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. योजनेत सहभागी व्हायचे नसल्यास नोंदणीच्या अंतिम मुदतीच्या किमान सात दिवस आधी संबंधित बँकेला लेखी स्वरूपात कळविणे बंधनकारक आहे. शेतकऱ्यांना https://pmfby.gov.in या अधिकृत पोर्टलवर स्वतः नोंदणी करता येईल. तसेच बँका, विमा कंपनीने नियुक्त केलेले प्रतिनिधी, क्रॉप इन्शुरन्स ॲप आणि सामूहिक सेवा केंद्रांच्या (CSC) माध्यमातूनही अर्ज करता येणार आहेत. बुलढाणा जिल्ह्यासाठी बजाज जनरल इन्शुरन्स बुलढाणा जिल्ह्यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेची अंमलबजावणी बजाज जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेडमार्फत करण्यात येत आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी प्रति हेक्टर विमा हप्ता गहू (बागायत) पिकासाठी ११२ रुपये ५० पैसे, हरभरा पिकासाठी १८० रुपये, तर रब्बी कांदा पिकासाठी ४ हजार ७५० रुपये विमा हप्ता निश्चित करण्यात आला आहे. उन्हाळी भुईमुगासाठी दिलेल्या माहितीत विमा हप्त्याचा दर नमूद नाही. एल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेता, पिकांचे संभाव्य नुकसान आणि त्यातून उद्भवणारे आर्थिक संकट टाळण्यासाठी पीक विमा संरक्षण महत्त्वाचे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीची प्रतीक्षा न करता वेळेत नोंदणी करून योजनेचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी संबंधित पीक विमा कंपनीचे कार्यालय, तहसीलदार कार्यालय किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

ही सरळ सरळ हुकूमशाही:हक्कासाठी जनतेला रस्त्यावर उतरावेच लागेल, ऊस आंदोलन आणि गोकुळवरून पृथ्वीराज चव्हाणांचा सरकारवर घणाघात

भारत संग्राम | प्रतिनिधी

कोल्हापूर/पुणे : ऊस आंदोलन आणि कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघामध्ये सुरू असलेल्या राजकीय हस्तक्षेपावरून राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. "सध्या राज्यात जे काही सुरू आहे, ती सरळ सरळ हुकूमशाही आणि दादागिरी आहे. लोकांनी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन केल्याशिवाय हे सरकार कोणालाही दाद देणार नाही," असा घणाघात पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. गोकुळ दूध संघाच्या मुद्द्यावर भाष्य करताना चव्हाण म्हणाले, "निवडून आलेल्या लोकांचे अधिकार काढून घ्यायचे आणि आपल्या विचाराची माणसे तिथे बसवायची, हा प्रकार सुरू आहे. अतिशय उत्कृष्टपणे चाललेल्या गोकुळसारख्या आर्थिक संस्थेवर जबरदस्तीने कब्जा करण्याचे काम सुरू आहे. येनकेन प्रकारे सत्ता हातात ठेवण्यासाठी आता गोकुळमध्ये कायदा बदलायची प्रक्रिया सुरू आहे, हे सगळे हुकूमशाहीचेच लक्षण आहे. हे लोक सहन करतील की नाही माहीत नाही, पण यावर नक्कीच कोर्टकचेरी होईल." भाजप आणि राज्य सरकारच्या कार्यपद्धतीवर गंभीर आरोप करताना ते म्हणाले, "सत्ता हातात ठेवण्यासाठी निवडणूक यादीतून १३ कोटी लोकांना वगळणे असेल, ईव्हीएम (EVM) चा वापर असेल, किंवा सातारा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत भाजपच्या लोकांनी युती सरकारच्या मंत्र्यांना केलेली मारहाण असेल, ही सगळी हुकूमशाहीचीच लक्षणे आहेत." ऊस आंदोलनाला पाठिंबा दर्शवत पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, "मी काल स्वतः या सत्याग्रहात सहभागी झालो होतो. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी रस्ता रोको केल्याबरोबर त्याला यश मिळाले, कारण लोकांच्या मनात प्रचंड मोठी चीड आहे. राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे, २०१७-१८ पासून ऊसाच्या एफआरपी (FRP/MSP) मध्ये वाढ झालेली नाही. महागाई आणि उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे, पण शेतकऱ्यांना उचित मोबदला मिळत नाहीये. त्याविरुद्ध हे आंदोलन होते." जनतेला संघर्षाचे आवाहन करताना चव्हाण यांनी स्पष्ट केले की, "जोपर्यंत लोक एकजुटीने स्वतः रस्त्यावर उतरून विरोध करत नाहीत आणि सरकारला नमवत नाहीत, तोपर्यंत गोकुळसारख्या सहकारी संस्था असोत किंवा ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन असो, सरकार ते दडपून टाकेल. त्यामुळे गोकुळ असो वा इतर कोणताही प्रश्न, लोकांनी आपल्या हक्कासाठी आणि अधिकारांसाठी तीव्र आंदोलन केले नाही, तर हे हुकूमशाही सरकार कुणालाही दाद देणार नाही."

आमदार श्वेता महाले यांच्या समर्थ पाठपुराव्याला यश; पेनटाकळीच्या पाणीप्रश्नावरील उपोषणाची सांगता!

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ निलेश कोल्हे



चिखली : पेनटाकळी धरणातील पाणीवाटपाच्या प्रश्नावरून सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या उपोषणाची अखेर आमदार श्वेता महाले यांच्या पुढाकाराने आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी केलेल्या प्रभावी पाठपुराव्यामुळे सांगता झाली. शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊ नये, त्यांच्या हक्काचे पाणी त्यांना मिळावे आणि दोन्ही बाजूंच्या शेतकऱ्यांच्या गरजांचा समतोल राखला जावा, यासाठी आमदार श्वेता महाले यांनी आपली सर्व कामे बाजूला ठेवून या प्रश्नात लक्ष घातले. शेतकऱ्यांच्या वेदना आणि त्यांच्या मागण्यांची तीव्रता लक्षात घेऊन त्यांनी प्रशासन आणि संबंधित लोकप्रतिनिधींकडे हा प्रश्न अतिशय तळमळीने मांडला.

या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयात नामदार प्रतापराव जाधव, आमदार श्वेता महाले, मेहकरचे माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला शेतकरी तसेच शेतकरी प्रतिनिधी विनायक सरनाईक हेदेखील उपस्थित होते. बैठकीत पेनटाकळी धरणाच्या वरच्या आणि खालच्या बाजूला असलेल्या शेतकऱ्यांच्या पाणीविषयक गरजा, पिण्याच्या पाण्याची आवश्यकता आणि उपलब्ध जलसाठ्याचा सविस्तर विचार करण्यात आला. धरणातील उपलब्ध पाणीसाठा, त्याचे बाष्पीभवन, पाण्याचा अपेक्षित वापर, सिंचनासाठी आवश्यक असलेली पाण्याची मात्रा, पिण्याच्या पाण्याची गरज, पाण्याचे वहन करताना होणारी संभाव्य घट तसेच धरणाची सद्यस्थिती आणि पाण्याचे नियोजन यांसारख्या महत्त्वपूर्ण तांत्रिक बाबींचा विचार करून दोन्ही बाजूंच्या शेतकऱ्यांना न्याय मिळेल, अशा पद्धतीने पाणीवाटपाचे नियोजन करण्याबाबत बैठकीत एकमत झाले. विशेषतः पेनटाकळी धरणाच्या वरच्या बाजूला असलेल्या आणि उपोषणाला बसलेल्या शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचे कोणत्याही परिस्थितीत नुकसान होऊ नये, पिके पाण्याअभावी जळू नयेत किंवा पाण्यामुळे बुडून नुकसान होऊ नये, यासाठी आवश्यक ते पाणी उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी तोंडी आश्वासन दिले. मात्र, पाण्याच्या अंतिम नियोजनाबाबत पालकमंत्र्यांसोबत बैठक झाल्यानंतर उद्या अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. बैठकीनंतर आमदार श्वेता महाले यांनी उपोषणकर्त्या शेतकऱ्यांशी संवाद साधला. शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊ नये आणि त्यांच्या पाणीप्रश्नावर न्याय्य तोडगा निघावा, यासाठी आपण पूर्ण ताकदीने प्रयत्नशील असल्याची भूमिका त्यांनी मांडली. या प्रश्नावर कोणताही घाईघाईचा किंवा अंतिम निर्णय जाहीर न करता, प्रशासनाकडून योग्य तो निर्णय होण्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार असल्याची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. शेतकऱ्यांच्या हिताचा हा प्रश्न केवळ पाणीवाटपापुरता मर्यादित नसून त्यांच्या वर्षभराच्या कष्टांचा आणि उपजीविकेचा प्रश्न आहे, ही भावना आमदार श्वेता महाले यांनी प्रशासनासमोर ठामपणे मांडली. शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेत त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका त्यांनी घेतली. त्यांच्या या तळमळीच्या आणि भावनिक संवादामुळे उपोषणकर्त्या शेतकऱ्यांनी उपोषण मागे घेण्यास सहमती दर्शवली. अखेर आमदार श्वेता महाले यांच्या हस्ते लिंबूपाणी घेऊन शेतकऱ्यांनी उपोषणाची सांगता केली. उद्या पालकमंत्र्यांसोबत होणाऱ्या बैठकीत अंतिम निर्णय होणार असल्याने आता या निर्णयाकडे पेनटाकळी परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. शेतकऱ्यांच्या पिकांचे संरक्षण आणि दोन्ही बाजूंच्या शेतकऱ्यांना न्याय्य पाणीवाटप हाच या प्रश्नाच्या तोडग्याचा केंद्रबिंदू राहणार आहे...

रंगभूमी दिनानिमित्त एकांकिका व नाट्यानुभव कार्यक्रम

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

बुलढाणा : मराठी रंगभूमी दिनानिमित्त अक्षरदेह नाट्यकला संस्थेच्यावतीने "माझ्या गळा , तुझ्या गळा" या एकांकिकेचा तालीम स्वरुपातील प्रयोग व नाट्य अनुभव कथनाचा "नाते रंगभूमीशी" हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

स्थानिक भ्रातृमंडळाच्या रंगमंचावर ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वा. आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक विजय जायभाये यांच्याहस्ते होणार असून जेष्ठ रंगकर्मी गणेश बंगाळे हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. आहारतज्ञ वैशाली वैराळकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमात शशिकांत इंगळे लिखित व गणेश राणे दिग्दर्शित "माझ्या गळा, तुझ्या गळा" या एकांकिकेचा तालीम स्वरुपात प्रयोग सादर होणार आहे, तर नाट्यकर्मींच्या अनुभव कथनाचा "नाते रंगभूमीशी" हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला नाट्यरसिक व नाट्यकर्मींनी बहुसंख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन अक्षरदेह नाट्यकला संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे.

मालेगाव येथे 'आकांक्षा हाट व दिवाळी महोत्सवा'चे दिमाखात उद्घाटन; पहिल्याच दिवशी १ लाख २ हजारांचीविक्री

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रदीप सावले



मालेगाव : नीती आयोगांतर्गत आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत मालेगाव तहसील कार्यालय परिसरात 'आकांक्षा हाट व दिवाळी महोत्सव' निमित्त फराळ व गृहोपयोगी साहित्यांच्या खरेदी-विक्री मिनी प्रदर्शनीचे उद्घाटन जिल्हा परिषद वाशिमचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण यांच्या हस्ते फीत कापून उत्साहात करण्यात आले दि.४ नोव्हेंबर २०२६ ते ७ नोव्हेंबर २०२६ पर्यंत आयोजित या महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्याला प्रशासकीय अधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने महिला बचत गटांची उपस्थिती होती या उद्घाटनाच्या वेळी प्रकल्प संचालक किरण कोवे,जिल्हा अभियान व्यवस्थापक सुधीर खुजे,जिल्हा व्यवस्थापक संदीप ढाले,तहसीलदार दीपक पोळ,मालेगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी नितेश पाटील,तालुका अभियान व्यवस्थापक पवन आडे,एमआयएस तालुका व्यवस्थापक विनोद कऱ्हाळे,तालुका व्यवस्थापक श्रद्धा चक्रे तसेच सर्व प्रभाग समन्वयक (एमसीआरपी) आणि ग्रामसखी उपस्थित होत्या.

सदर प्रदर्शनीमध्ये एकूण ५१ स्वयंसहायता समूहांनी सहभाग घेतला आहे महिलांनी स्वतःच्या हाताने बनवलेला स्वादिष्ट दिवाळी फराळ जसे की चकली,लाडू,करंजी यांसह महालक्ष्मीच्या मूर्ती,मातीच्या पणत्या,झुणका भाकर आणि खानावळ यांसारखे विविध स्टॉल थाटण्यात आले आहेत ग्रामीण भागातील महिलांच्या हाताला काम आणि उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देणाऱ्या या उपक्रमाला पहिल्याच दिवशी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून,पहिल्या दिवशी तब्बल १ लाख २ हजार रुपयांची विक्रमी उलाढाल व विक्री झाली आहे हा महोत्सव नागरिकांसाठी पर्वणी ठरत असून नागरिकांनी भेट देऊन महिलांच्या उत्पादनांची खरेदी करावी,असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

उद्या संध्याकाळी सात वाजता किनगाव जट्टू येथे शेतकरी नेते रविकांत तुपकरांची दुष्काळी प्रश्नावर जाहीर सभा

भारत संग्राम | प्रतिनिधी





उद्या दिनांक, सहा नोव्हेंबर रोजी संध्याकाळी सात वाजता क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांची किनगाव जट्टू येथील श्रीराम मंदिरा समोर जाहीर दुष्काळ सभा होणार आहे या सभेला परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सहदेव लाड यांनी केले

शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर राज्य सरकारला व प्रशासनाला गुडघे टिकण्यास भाग पाडणारे क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर हे एक दिवसीय लोणार तालुका दौऱ्यावर येणारा आहे तालुक्यातील खळेगाव ,महार चिकना, खापरखेड घुले ,सोमठाणा ,ब्राह्मण चिकना ,हिवराखंड ,शिंदी,पिंप्री खंदारे, बीबी, चोपांग्रा (वीरपांग्रा)खंडाळा या गावांचा दौरा करून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसोबत रविकांत तुपकर हे चर्चा करणार आहे व संध्याकाळी सात वाजता किनगाव जट्टू येथे जाहीर शेतकरी दुष्काळ सभा घेऊन पुढील आंदोलनाची दिशा ठरविणार आहे तरी या सभेला शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सहदेव लाड यांनी केले आहे

निवृत्तीवेतनधारकांनी ३० नोव्हेंबरपर्यंत हयातीचा दाखला सादर करा - जिल्हा कोषागार कार्यालयाचे आवाहन

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

बुलढाणा : जिल्हा कोषागार कार्यालय बुलढाणा व इतर कोषागार कार्यालयांच्या वतीने १ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत देशव्यापी डिजिटल जीवन प्रमाणपत्र अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील सर्व राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक तसेच कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी आपला वार्षिक हयातीचा दाखला सादर करावा, असे आवाहन जिल्हा कोषागार कार्यालयाने केले आहे.

निवृत्तीवेतन अखंडित सुरू राहण्यासाठी संबंधितांनी वेळेत हयातीचा दाखला सादर करणे आवश्यक आहे. यासाठी विविध पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन मिळणाऱ्या बँकेच्या शाखेत जाऊन हयातीचा दाखला सादर करता येईल. यासाठी कोषागार कार्यालयाने बँकांकडे नावांची यादी पाठविली आहे. बँकेच्या शाखेत यादीतील नाव शोधून स्वाक्षरी करावी. स्वाक्षरी करता येत नसल्यास उजव्या किंवा डाव्या अंगठ्याचा ठसा उमटवून RHT/LHT (Right/Left Hand Thumb) अशी नोंद करून स्वाक्षरीची खात्री करावी.

कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना पुनर्नियुक्ती मिळाली असल्यास यादीतील सहाव्या रकान्यात 'YES' नमूद करून त्याबाबतचे आदेश बँकेत जमा करावेत. तसेच पुनर्विवाह झाला असल्यास सातव्या रकान्यात 'YES' अशी नोंद करावी. याशिवाय निवृत्तीवेतनधारकांना स्मार्टफोनमध्ये आधार फेस आरडी आणि जीवन प्रमाण ॲप डाउनलोड करून चेहऱ्याची ओळख पटवून डिजिटल हयातीचा दाखला सादर करता येणार आहे. तसेच इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेच्या पोस्ट इन्फो ॲपद्वारे विनंती नोंदवून पोस्टमनच्या माध्यमातून घरबसल्या बायोमेट्रिक पद्धतीने हयातीचा दाखला सादर करण्याची सुविधाही उपलब्ध आहे. जिल्ह्यातील सर्व संबंधित निवृत्तीवेतनधारकांनी या पर्यायांचा लाभ घेऊन १ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आपला हयातीचा दाखला सादर करावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी योगेश धोंगडे यांनी केले आहे.

भट्टड ले-आउट मधील खोल मोठ्या क्षतीग्रस्त विहीरीत पडलेल्या वासरूचे वाचविले प्राण

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे





बुलढाणा : खामगांव शहरातील चांदमारी फैल स्थित भट्टड ले-आउट मधील मोकळ्या जागेत असलेली एक जुनी विहीर सध्या अत्यंत धोकादायक स्थितीत आहे. सदर विहीर ढासळलेली असून तिच्या आत एक मोठे झाड पडलेले व घाण कचरा साचलेला आहे. सध्या या विहिरीला केवळ सिमेंट पोलाचे तार कंपाऊंड केलेले आहे, जे अपुरे व तुटक्या परिस्थितीत आहे.

पूर्वी ही विहीर सुरक्षित असताना स्थानिक नागरिक पिण्याच्या पाण्यासाठी तिचा वापर करत होते. सध्या पडक्या स्थितीत विहीर खूप खोल व मोठी झालेली आहे. शेलोडी गावाकडे जाणाऱ्या काँक्रीट रस्त्याला लागूनच असून ही विहीर नगर परिषद, खामगांवच्या हद्दीत येते. कधीही विपरीत घटना घडू शकते याची शक्यता नाकारता येत नाही. आज सकाळी पहाटे ७ वाजता एका लाल रंगाच्या गाईचे वासरू या विहिरीत पडल्याची घटना घडली. माहिती मिळताच एकनिष्ठा गौ सेवा रक्तसेवा फाउंडेशनचे गौ सेवक श्री. सुरजभैय्या यादव घटनास्थळी पोहचले व बुद्धी चातुर्याने दोरीच्या सहाय्याने खोल विहिरीतून वासराला सुखरूप बाहेर काढले. या गौ सेवेत गौ सेवक गोलु शर्मा, अविनाश इंगळे, शिवम दिवटे आणि नगर परिषद खामगांवचे कर्मचारी महेश राठोड, उमेश चावरे, रुपेश सारसर, मयुर धेडुंदे तसेच अग्निशामक दलाचे गाडी चालक वसंता घोंगे, नितीन भातखेडे अग्निशामक गाडी सह घटनास्थळी दाखल झाले. एकनिष्ठा गौ सेवकांच्या पुढाकाराने वासराला सुखरूप व जिवंत बाहेर काढून नवजीवनदान मिळाले. तसेच या प्रेस नोट द्वारे प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे की, नगर परिषद, खामगांवने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी. सद्यस्थितीतील दुष्काळ परिस्थिती लक्षात घेऊन या विहिरीचे पुनर्वसन व दुरुस्ती करून, विहिरीवर मजबूत लोखंडी जाळी बसवून नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा पुन्हा उपलब्ध करून द्यावी. जेणेकरून भविष्यात अशा प्रकारची कोणतीही जीवघेणी घटना घडणार नाही. - एकनिष्ठा गौ सेवा रक्तसेवा फाउंडेशन, खामगांव व समस्त खामगांवकर नागरिकांची मांगणी आहे अशी माहिती अविनाश इंगळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.